भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४३४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०६/२०१७

**१) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन दगडाने डोक्याचे मागील भागाला मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०५/०६/२०१७ ते २१.०० ते २१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नुतन सुकाराम बन्सोड वय रा. आंबेडकर वार्ड मुजबी हा घराचे छपरात झोपला असता आरोपीने जुन्या भांडणा वरुन फिर्यादीचे डोक्याचे मागील भागाला दगडाने मारुन जखमी करुन शिवीगाळ केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) घराचे समोरील दाराचा ताला तोडुन गोदरेज आलमारीतील चांदीची वाटी व चिल्लर पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २६/०५/२०१७ ते ०६/०६/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी दिपक माधवराव कडव वय ५० वर्ष, रा. समृध्दी नगर तकीया वार्ड भंडारा हे घराला कुलुप लावुन भाचीच्या लग्नाला नागपुर येथे गेले व दिनांक ०६/०६/२०१७ चे ०८.३० वा. घरी परत आले तेव्हा त्याचे घराला समोरील दाराचा ताला तोडलेला दिसल्याने घरात जावुन पाहनी केली असता गोदरेज आलमारीत ठेवलेली चांदीची वाटी २० ते ३० ग्रॅम वजनाची किंमती ६००/–रु. व चिल्लर २५००/–रु. असा एकुण ३१००/–रु. चा माल कुणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाडे पो. स्टे. भंडार हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ०६/०६/२०१७ चे १२.०० वा. ते १३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी विनोद प्रभाकर नागोसे वय ३८ वर्ष, रा. राम नगर खात रोड भंडारा यानी आपली हिरो होंडा पॅशन प्रो मोटार सायकल कमांक एमएच ३६ पीएल २५०७ किंमती २०,०००/–रु. ची घराचे शेजारी गेट समोर ऊभी करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ३७९ भांदवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. दांदडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०६/०६/२०१७ चे १३.३० वा. दरम्यान यातील आरोपी हे घरा समोर असलेल्या खाली जागेतील झाडे उपडुन फेकत असतांना फिर्यादीने हटकले असता आरोपी क्र.२ ने वाद घालुन भांडण सुरु असतांना आरोपी क्र. १ ने छेडछाळीचे उद्येशाने वाईट नजरेने फिर्यादीचे जवळ येवुन फिर्यादीचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४,३२३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. दांदडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) आंबे तोडण्या करीता झाडावर चढला असता तोल न सांभाळल्याने खाली पडल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०६/०६/२०१७ चे १५.४५ वा. दर. यातील मृतक पुरुषोत्तम भाऊराव मारवाडे वय ४० वर्ष, रा. चांदोरी हा कैलास काकडवाडे यांचे शेतात आंबेतोडण्या करीता झाडावर चढला असता तोल न सांभाळल्याने झाडावरुन खाली पडल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन सरतर्फे फिर्यादी पो. शि. रहांगडाले यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**६) नायलॉन दोरीने गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०५/०६/२०१७ चे १०.०० ते १८.३० वा. दर. यातील फिर्यादीचे चुलत काका मृतक ईश्वर तुळशीराम ईश्वरकर वय ४५ वर्ष, रा. खोलमारा हा स्वत:चे शेतातील आंब्याच्या झाडाला नायलॉन दोरीने बांधुन गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी लोकेश आनंदराव मदनकर वय ३० वर्ष, रा. खोलमारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. जाधव पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०६/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०८ तीन सिटर वाहनांवरती ११ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

07.6

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.